**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - १७/०७/२०२६**

**अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची बृहन्मुंबईमध्ये PIT-NDPS अंतर्गत कारवाई दरम्यान ड्रग्ज् तस्करी करणारा इसम नामे कामरान जावेद शेख ऊर्फ कामु पटेल ऊर्फ पटेल, वय ३९ वर्षे यास ०१ वर्षे करीता नाशिक कारागृहात स्थानबध्द केलेबाबत.**

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट यांनी त्यांचेकडील गु.र.क्र. १५/२०२६, कलम ८ (क) सह २२ (ब) एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अन्वये दाखल गुन्हयात अंमली पदार्थाची तस्करी करणारा अटक आरोपी सराईत गुन्हेगार कामरान जावेद शेख ऊर्फ कामु पटेल ऊर्फ पटेल, वय ३९ वर्षे, रा. ठि. मैनुद्दीन कॉम्प्लेक्स, रुम नंबर २०५, दुसरा माळा, शायनिंग नगर, कौसा, मुंब्रा, जि. ठाणे याचेवर एम.डी.(मेफेड्रॉन) व मेथाएमफेटामाईन या अंमली पदार्थाची तस्करीचे एन. डी. पी. एस. कायदयान्वये ०७ गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले. तसेच नमुद गुन्हयात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन ते न्यायप्रविष्ठ होते. तसेच सदर ड्रग्ज् तस्करी करणारा इसम कामरान जावेद शेख ऊर्फ कामु पटेल ऊर्फ पटेल, वय ३९ वर्षे हा सर्व एन.डी.पी.एस. गुन्हयांमध्ये जामीनावर मुक्त आहे. सदर ड्रग्ज् तस्करी करणारा इसम कामरान जावेद शेख ऊर्फ कामु पटेल ऊर्फ पटेल हा जामीनावर सुटताच परत अंमली पदार्थाचा व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याचेविरुदध मा. पोलीस आयुक्त सो. बृहन्मुंबई यांचेवतीने अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट, गु.शा. मुंबई यांनी स्थानबध्द आदेश जारी होण्याकरीता मा. स्थानबध्द अधिकारी तथा प्रधान सचिव सो (विशेष), गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदरच्या स्थानबध्द प्रस्तावास गृह विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडुन मंजुरी आदेश प्राप्त झाले. त्यानुसार नमुद इसमास ताब्यात घेवुन त्याला स्थानबध्द आदेशाची बजावणी करून ०१ वर्ष स्थानबध्दतेकरीता दि. १७/०७/२०२६ रोजी नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, नाशिक रोड, नाशिक येथे दाखल करण्यात आले आहे.

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२६ मध्ये अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधीनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये सन २०२६ मध्ये जामीनावर सुटल्यानंतर वारंवार गुन्हे करणाऱ्या १० आरोपींना स्थानबद्ध केले असुन ही स्थानबध्दतेची ११ वी कारवाई आहे.**

- **कामरान जावेद शेख ऊर्फ कामु पटेल ऊर्फ पटेल, वय ३९ वर्षे हा अंमली पदार्थ व्यवसायात सक्रीय असल्याचे अंमली पदार्थ विरोधी कायदयाअंतर्गत दाखल गुन्हे अभिलेख:-**

१) अं.प.वि.कक्ष, आझाद मैदान युनीट, गु.र.क्र. ११/२०१७, कलम ८(क) सह २२(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
२) वडाळा टी टी पो.ठाणे, गु.र.क्र. ४३/२०१९, कलम ८(क) सह २२, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
३) वी पी रोड पो.ठाणे, गु.र.क्र. २७३/२०१९, कलम ८(क) सह २२ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
४) अं.प.वि.कक्ष, वरळी युनीट गु.र.क्र. ०८/२०२१, कलम ८(क) सह २२(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
५) डी बी मार्ग पो.ठाणे, गु.र.क्र. ९०/२०२५, कलम ८(क) सह २२(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ सह कलम १११ भारतीय न्याय संहिता.
६) वी पी रोड पो.ठाणे, गु.र.क्र. १५६२/२०२५, कलम ८(क) सह २२ (अ) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
७) अं.प.वि.कक्ष, गु.र.क्र. १५/२०२६, कलम ८ (क) सह २२ (ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५

सदरची यशस्वी कामगिरी ही मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा. श्री कृष्णकांत उपाध्याय, अप्पर पोलीस आयुक्त(गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, वरळी युनिटचे प्र.पो.नि. संतोष साळुंखे यांचे नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमित घोगरे तसेच गुन्हे प्रतिबंधक शाखेचे व.पो.नि. सुवर्णा अडसुळे, पो.नि. सरिता गावडे, स.पो.नि. रविंद्र पाटील, पो.उ.नि. संदिप शिंदे, पो.उ.नि. सतिश निंबाळकर यांनी केली आहे.

------oooo------



**कामरान जावेद शेख ऊर्फ कामु पटेल ऊर्फ पटेल, वय ३९ वर्षे**